# मराठी (कुमारभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 2 री

**प्र. 1. (अ)**

**(1)** **मराठी भाषेने या भाषांमधील शब्द आत्मसात केले आहेत**

- संस्कृत
- फारसी
- कन्नड
- इंग्रजी

**(2)** **शब्दांची व्युत्पत्ती शोधण्याचे फायदे लिहा**

- भाषेतली गंमत जाणून घेता येते.
- खूप नवीन माहिती मिळते.
- शब्दांची पाळेमुळे किती दूरवर पसरलेली असतात, हे कळते.
- आपल्याकडून भाषिक चुका होत नाहीत.
- शब्द मनात पक्का रुजतो.

*(**नोंद** : वरीलपैकी कोणतेही चार लिहावेत.)*

**(3)** परभाषेतून आपल्या भाषेत अनेक नवीन शब्द आले आहेत, ते आपण स्वीकारले आहेत.

मात्र काही वेळा परभाषेतील शब्द अकारण वापरले जातात आणि तेसुद्धा आपल्या भाषेत त्यासाठी अत्यंत सार्थ, समर्पक शब्द असताना! अलीकडे ''ती पिवळीवाली द्या'', ''तो पांढरावाला पट्टा दाखवा'' अशी वाक्ये सर्रास ऐकू येतात. वास्तविक पाहता 'पिवळी बॅग' आणि 'पिवळीवाली बॅग' यांत कोणता फरक आहे? 'पिवळी बॅग' या शब्दप्रयोगातून आधीपासूनच योग्य अर्थ व्यक्त होत असताना 'पिवळीवाली' हा नवीन शब्दप्रयोग का करावा? मराठीत 'वाला' हा प्रत्यय फक्त नामाला जोडला जातो. 'पिवळी' हे विशेषण आहे. मराठीत विशेषणाला किंवा सर्वनामाला 'वाला' हा प्रत्यय जोडण्याची प्रथाच नाही. शिवाय त्या नवीन शब्दप्रयोगाने अर्थामध्ये कोणतीही भर पडत नाही. म्हणून गरज नसताना परभाषेतील शब्द वापरून बोलू नये, हे लेखिकेचे मत योग्यच आहे.

**प्र. 1. (आ)**

**(1)** सोनाली आणि रूपाली यांची झोपण्यापूर्वीची दंगामस्ती

→ दोघीही बिछान्यात चक्क नाचत, कुदत.

→ थकल्यावर झोपण्यासाठी आपापली जागा पकडत.

→ रूपाली 'फुस्' करून अंग टाकी व झोपी जाई.

→ सोनालीला लगेच झोप येत नसे. तिला लहान मुलासारखे थोपटावे लागे. मगच ती झोपी जाई.

**(2)** (i) सोनाली व रूपाली एकत्र फिरत, एकत्र झोपत.

(ii) एकत्र जेवण घेत.

**(3)** आम्ही एकदा पारंब्यांना लोंबकळत खेळत होतो. निरंजनने बिस्किटे आणली होती. ती आम्ही वरच्या वर एकमेकांकडे फेकत आणि झेलत होतो. एखादे खाली पडत होते. आमच्या सोबतचा कुत्रा ते पडलेले बिस्कीट खाई. ते पाहून निरंजनला लहर आली. तो खाली उतरला. त्याने एक बिस्कीट दूर फेकले. दूरवर जाऊन त्या कुत्र्याने ते खाल्ले. नंतर नंतर निरंजन बिस्किटे फेकण्याची बतावणी करू लागला. बिचारा कुत्रा धावत जाई पण त्याला काही मिळत नसे. तो रागाने गुरगुर करीत होता. निरंजनने पातळसा दगड घेऊन बिस्कीट म्हणून फेकला. कुत्रा मोठ्या आशेने तिकडे धावला. पण बिस्कीट नाही, हे कळताच तो चवताळला. संतापाने निरंजनकडे धावला. निरंजन घाबरून पारंबीवर चढला. चवताळलेला कुत्रा तिथे आलाच. त्याने झेप घेतली आणि निरंजनला पकडले. पण निरंजनची पॅन्ट फक्त त्याच्या तोंडात आली. पॅन्ट टर्रर करून फाटली. आम्ही सगळे स्तब्ध होऊन बघतच राहिलो.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) पाणी

→ चढते → झाडावर

→ लोळते → गच्चीवर

(ii) पाणी

→ बुडवते → घाट

→ तुडवते → वाट

**(2)** (i) पाणी शांतपणे वाहते, तेव्हा ते जणू काही कोणतेही नुकसान होऊ नये, याची काळजीच घेत असावे असा भास होतो. म्हणून ते त्या वेळी समजूतदार वाटते.

(ii) नदीकाठावरच्या गरिबांच्या झोपड्या उद्ध्वस्त करणाऱ्या पुराच्या पाण्याला पाहिल्यावर त्याच्या मनात त्या गरीब, दुबळ्या माणसांबद्दल कणवच नसावी, अशी भावना मनात जागी होते आणि ते पाणी स्वभावाने क्रूर असावे, असे वाटू लागते.

**प्र. 2. (अ)**

**(1)**

**मन वाईट गोष्टींकडे वळू नये म्हणून करायच्या गोष्टी**

- मन भवच्चरित्रावर (परमार्थावर) जडवावे.
- मनातील निश्चय ढळू देऊ नये.
- भजन करताना मन विचलित होऊ नये.
- मन मलीन होऊ देऊ नये.

**(2)** (i) निश्चय — कधीही ढळू नये.

(ii) चित्त — भजन करताना विचलित होऊ नये.

(iii) दुरभिमान — सर्व गळून जावा.

(iv) मन — मलीन होऊ नये.

**(3)** माणसाने चारित्र्यसंपन्न होण्यासाठी स्वत:मधील स्वतत्त्व मनोमन ओळखावे. आत्मविश्वास वाढवावा. गर्विष्ठपणाचा त्याग करावा. दुरभिमान अजिबात बाळगू नये. आपले मन वाईट विचारांनी मलीन, भ्रष्ट करू नये. मन शुद्ध करावे. आत्मज्ञान वाढवावे. आत्मज्ञानामध्ये सर्व अनिष्ट गोष्टी जाळून टाकाव्यात.

**(4)** सर्वप्रथम चांगल्या गोष्टी व वाईट गोष्टी कोणत्या यांची निवड विवेकबुद्धीने करावी. त्यानंतर वाईट गोष्टींचा त्याग करण्यासाठी मन खंबीर करावे. बुद्धी स्थिर ठेवावी. चंचलता सोडून द्यावी. चांगल्या मित्रांच्या संगतीत नेहमी राहावे. त्यांचा योग्य तो सल्ला घ्यावा. थोरामोठ्यांचा आदर करावा. त्यांचे अनुभवाचे बोल ग्रहण करावेत. चांगल्या संस्कारमय पुस्तकांचे वाचन करावे. सद्विचाराने वर्तन करावे. दुसऱ्यांचे मन जाणून घ्यावे. शक्यतो परोपकार करावा. आपल्या वागण्याने कुणीही दुखावणार नाही याची काळजी घ्यावी. प्रेममय हृदय धारण करावे. जनात आपण प्रिय ठरू असे वर्तन करावे.

**प्र. 2. (आ)**

**(1)**

| उत्तमलक्षण |
|---|
| (i) कवितेचे कवी — संत रामदास |
| (ii) कवितेचा विषय — उत्तम माणसाची लक्षणे |
| (iii) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे — मला ही कविता खूप आवडली. एकतर हे विचार पटकन पटण्यासारखे आहेत. ही कविता उच्चारताना, वाचताना आनंद होतो. उच्च, उदात्त विचार मनात घोळवल्याने मनही आनंदित होते. सर्व गुण-अवगुण रामदासांनी अत्यंत स्पष्टपणे, परखडपणे सांगितले आहेत. कुठेही शब्दांचा बोजडपणा नाही. प्रत्येक शब्दागणीक अर्थ स्पष्ट होत जातो. मुख्य म्हणजे दैनंदिन जीवनात वागताना आवश्यक असलेल्या गुणांचे मार्गदर्शन घडत असल्याने कविता आपली, स्वत:ची, स्वत:साठी असलेली वाटत राहते. |

(2)

| खोद आणखी थोडेसे |
|---|
| (i) कवितेची कवयित्री – आसावरी काकडे |
| (ii) कवितेचा विषय – प्रयत्न व सकारात्मकता यांचे महत्त्व |
| (iii) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – ही कविता मला खूप खूप आवडली आहे. ही कविता वाचता वाचता मनातील निराशेचे मळभ दूर होते. प्रयत्न करीत राहण्यातच यशाचा मार्ग आहे, हे मनोमन पटते. थोड्याशा प्रयत्नाने, थोड्याशा बळानेही उमेद निर्माण होते. या शब्दांनी मनाला उभारी येते. ही कविता माणसाला चांगले जीवन जगण्याची प्रेरणा देते. |

**प्र. 2. (इ)**

**आशयसौंदर्य :** 'वस्तू' या कवितेत कवी द. भा. धामणस्कर यांनी निर्जीव वस्तूंनाही सजीव प्राणिमात्रांसारख्या भावना असतात, त्या संवेदनशील असतात, हे बिंबवले आहे. तसेच वस्तूंना सहानुभूतीने समजून घ्यायला हवे आणि त्यांना प्रेमाने वागवायला हवे, असे प्रतिपादन केले आहे.

**काव्यसौंदर्य :** बहुतेक माणसे वस्तूंना निर्जीव समजतात आणि त्यांच्याशी निर्दयतेने वागतात. त्यांना कसेही हाताळतात. माणसांच्या या कठोर कृत्यावर भाष्य करताना वरील ओळींत कवी म्हणतो की, कदाचित वस्तूंना जीव नसेलही आणि मनही नसेल, म्हणून त्यांना आपण कठोरपणे वागवावे का? वस्तूंना मन आहे, असे समजून जर त्यांच्याशी आपण चांगले वर्तन केले तर वस्तूंना खूप आनंद होतो. त्या सुखावतात. आपल्या कुटुंबातील त्या घटक आहेत, अशी आपुलकी आपण दाखवली तर वस्तूही आपल्याला प्रेम व माया देतील.

**भाषिक वैशिष्ट्ये :** मुक्तशैलीतल्या या रचनेमुळे कवीने या ओळींतून रसिकांशी थेट संवाद साधला आहे. अगदी साध्या पण आवाहक शब्दांत मोठे तत्त्व बिंबवले आहे. वस्तू व माणूस यांतील स्नेहबंध आत्मीयतेने जपायला हवा, हा संदेश अगदी हळुवार पद्धतीने कवीने दिला आहे.

**प्र. 3.**

**(1)** स्वातींनी काय केले? त्यांनी प्रथम स्वतःसमोर ठाकलेली परिस्थिती नीट समजून घेतली. आपण काय काय करू शकतो, याचा त्यांनी अंदाज घेतला. त्यानुसार निर्णय घेतले. एकदा निर्णय घेतल्यावर मात्र त्यांनी मागे वळून पाहिले नाही. आपल्याला अमुक अमुक गोष्टी नक्की करता येतील, असा त्यांनी विश्वास बाळगला. कठोर परिश्रम घेतले. परिश्रमाबाबत कोणतीही तडजोड केली नाही. योजलेल्या मार्गावर त्या ठामपणे पावले टाकत राहिल्या. त्यामुळे त्या यशापर्यंत पोहोचल्या.

यश म्हणजे वेगळे काय असते? फक्त परिस्थितीचा विचार करून निवडलेल्या दिशेने न घाबरता, कच न खाता ठामपणे पावले टाकणे आणि त्यासाठी आवश्यक ते सर्व कष्ट घेणे म्हणजेच यश. स्वाती यांच्या जीवनकार्यावरून हे लक्षात येते.

**(2)** मातीमध्ये बी पेरले की, मातीच्या मायेच्या संस्कारांमधून वृक्ष जन्माला येतो. माती ऊन-वारा-पाऊस-वादळाची झळ सोसून बीजाची जोपासना करते. बीजाला दुष्काळाची झळ सोसावी लागू नये; म्हणून ती दुष्काळाशी सामना करते. या प्रतीकांतून कवीने सामाजिक आशय मांडला आहे. आज भ्रष्टाचार, दैन्य, अंधश्रद्धा व इतर धर्मांध प्रवृत्ती घटक यांमुळे समाज पोखरलेला आहे आणि त्यात माणुसकी लयाला जात आहे. अशा या आधुनिक काळात माणसांवर चांगले संस्कार होऊन माणुसकी निर्माण होणे आवश्यक आहे. म्हणून माणुसकी पेरणे म्हणजेच विवेकी माणूस निर्माण करण्याची आजच्या काळाची गरज अधोरेखित होते.

**(3)** बालसाहित्यिका गिरिजा कीर यांनी बाल-कुमारांच्या भावविश्वावर आधारित साहित्य निर्माण केले. त्यातूनच जन्माला आली बालनाटिका 'एक अर्ज आहे बाप्पा.'

सुजाता आणि सदानंद यांच्या घरात घडणारी ही गोष्ट. घरातली मोठी माणसे बाहेर गेली आहेत, अशा वेळी छोटी मुले त्यांच्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या प्रश्नावर विचारविनिमय करीत आहेत. हा प्रश्न कोणता? तर; आई, बाबा, शेजारी यांचं बॉसिंग त्यांना सहन होत नाही; पण हे सांगणार कुणाला? मग सर्वांना वाटते की आपली तक्रार आपण देवबाप्पापुढे मांडूया. तो आपल्यावर नक्की प्रसन्न होईल. मग देवबाप्पासाठी एक सामुदायिक अर्जलेखन सुरू होते. त्यात अतिशय सुंदर तक्रारी मांडल्या जातात. 'आईची शिफॉनची साडी नेसायला मिळालीच पाहिजे', 'बरफ का गोला खाण्याची आझादी पाहिजे', 'भेळ खायला मिळायलाच हवी' आणि मग मित्रमंडळींपैकीच काहीजण बाप्पाचे रूप घेऊन येतात आणि एकमेकांशी भांडू लागतात असे गमतीशीर प्रसंग उभे करून मुलांचे भावविश्व उलगडण्याचा यशस्वी प्रयत्न या नाटिकेतून केलेला दिसून येतो.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) ती दोघे बहीणभाऊ आहेत. – बहीणभाऊ

(ii) कुठलीही गोष्ट करण्यापूर्वी सत्यासत्याचा विचार करावा. – सत्यासत्य

(iii) कोपऱ्यातल्या मंडईत भाजीपाला चांगला मिळतो. – भाजीपाला

(iv) गरिबास अन्नपाणी द्यावे. – अन्नपाणी

**(2)** (1) (i) अपमान (ii) अपयश

(2) (i) गडगडाट (ii) फडफडाट

**(3)** (i) डोळे विस्फारून बघणे – **अर्थ :** डोळे मोठे करून आश्चर्याने बघणे.

**वाक्य :** भर उन्हात पावसाची सर आली, तेव्हा रमेश त्या दृश्याकडे डोळे विस्फारून बघू लागला.

(ii) लळा लावणे – **अर्थ :** प्रेम वाटणे, माया लावणे.

**वाक्य :** सखू मावशीने त्या अनाथ मुलाला भारी लळा लावला.

(iii) तुटून पडणे – **अर्थ :** त्वेषाने हल्ला करणे.

**वाक्य :** त्या अनोळखी कुत्र्यावर गल्लीतील इतर कुत्री तुटून पडली.

(iv) तावडीत सापडणे – **अर्थ :** कचाट्यात पडणे.

**वाक्य :** चोरून दूध पिणारा बोका एकदा आईच्या तावडीत सापडला.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) कंठ = गळा (ii) पाऊस = पर्जन्य

(2) (i) वर्णनीय × अवर्णनीय (ii) गुण × दोष

(3) (i) रस्ते – रस्ता (ii) वेळ – वेळा

(4) (i) समाजाची सेवा करणारा – समाजसेवक

(ii) वाहन चालवणारा – चालक

**(2)** (i) याच गच्चीवर दोघी पहिल्या पावसाळ्यात नाचल्या.

(ii) नुसतं सर्कशीसारखं वन्य पशूंना ट्रेनिंग देणे हा हेतू नव्हता.

**(3)** (i) ; – अर्धविराम

(ii) : – अपूर्णविराम

**(4)** (i) Comedy – सुखात्मिका

(ii) Handbill – हस्तपत्रक

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **'नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.